REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २६ फेब्रुवारी, १९४१ अंक ९

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.
'पायोनियर डाइंग हाऊस'
कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा
पुणें, लि. पुणें ४.

१० वा आठवडा
नवयुग चित्र
लग्न पहावं करून
दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर
नवयुग चित्र
मिनर्व्हा—पुणें

डॉ. एन. आर. राजोपाध्ये
यांच्या
अॅस्रगॉल् or शक्तिवर्धक पिल्स घ्या. किंमत ११ आ. फक्त.
सोल एजंटः "वेलणकर वनौषधालय", तुळशीबाग रस्ता, पुणें.
एजन्सी देणें आहे. दोन आण्याचे स्टँप्स् पाठवून विचारावें.

डॉ. एन. आर. राजोपाध्ये यांचे खास देखरेखीखालीं चाललेलें
"वेलणकर वनौषधालय"
येथें सर्व तऱ्हेच्या खात्रीच्याच वनस्पति व सिद्धौषधी मिळतील. १ पैशापासून ते सिद्धौषधीपर्यंत मिळण्याचें हें पुण्यांतील पहिलेंच दुकान होय. येथें चूर्णे, सप्तकाच्या काढ्याच्या पुड्याही ऑर्डर-प्रमाणें करून दिल्या जातात. येथें रोगी तपासून औषध देण्याची सोय आहे. त्याकरितां चार्ज रोज फक्त एकच आणा.
उघडण्याची वेळः—सकाळीं ८॥ ते १२ व दुपारीं ३॥ ते ८ पर्यंत.
पत्ता : "वेलणकर वनौषधालय" तुळशीबाग रस्ता, पुणें.

# विविध माहिती

### ब्रिटिश आगबोटींवर रेडिओ

१,६०० टनांखालील प्रत्येक ब्रिटिश आगबोटीवर एक वायरलेस सेट असलाच पाहिजे, अशी व्यवस्था आतां करण्यांत आली आहे. ह्या रेडिओंतून ब्रिटिश बातम्या ऐकतां येतील, अशी तरतूद असली पाहिजे.

### जपानचा पोलादाचा पुरवठा

जपानचा पोलादाचा व पेट्रोलचा पुरवठा अगदी असमाधानकारक नाहीं, असें जनरल होशिमा ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें. इतके दिवस अमेरिकेंतून येणाऱ्या मोडीपासून पोलाद तयार करण्यांत येत असे, परंतु अमेरिकेनें मोड पाठविण्याचें बंद केलें आहे.

### जर्मनीमधील संशोधन कार्य

"जर्मनीमध्यें संशोधनाचें कार्य बहुतेक बंद पडलें असून, प्रत्येक प्रयोगशाळेंत युद्धविषयक प्रश्नांचाच विचार चालू आहे. महत्त्वाचे शोध आतांपर्यंत लागले, ते संशोधक स्वेच्छेनें प्रयोग करीत असतां सहजी लागलेले आहेत. बहुतेक सर्व शोध १८ ते २४ वयाच्या शास्त्रज्ञांचेच आहेत. जर्मनीमधील ह्या वयाचे सर्व लोक राष्ट्रीय नियंत्रणाखाली सरकारी प्रयोग शाळेंत अगर सैन्यांत काम करीत आहेत, तेव्हां तो देश शास्त्रीय संशोधनांत मागें पडणें स्वाभाविक आहे. शास्त्रज्ञांस आपलें स्वतःचें संशोधन चालू ठेवण्यास जर्मनींत वावच नाहीं. हिटलरनें कित्येक नामवंत शास्त्रज्ञांस ते स्वतः ज्यू होते अगर त्यांचा विवाह ज्यू स्त्रियांशीं झाला होता म्हणून हद्दपार केलेलें आहे. कित्येक "आर्यन" शास्त्रज्ञांनीं आपण होऊन देशत्याग केला. निर्गत करण्यास पुरेशी अक्कल आपले देशांत आहे, अशी कोणीहि मिजास मारूं नये."

( ब्रूस ब्लिव्हेन )

### गंधक

गंधकाचें महत्त्व उद्योगधंद्यांत विशेष आहे. सलफ्यूरिक ॲसिड त्यापासूनच करतात. हिंदुस्थानांत दरसाल २० हजार टन गंधकाची आयात होते व त्यासाठी १८ ते २६ लक्ष रुपये परदेशी पाठवावे लागतात. युद्धास प्रारंभ झाल्यापासून हा आकडा ४५ लक्षांवर गेला आहे. गंधकाचा पुरवठा बंद पडला, तर कित्येक हिंदी कारखाने बंद करावे लागतील. दारुगोळ्याचे उत्पादनास व साखर तयार करण्यास गंधक अत्यावश्यक आहे. सरकारनें नेमलेल्या बोर्ड ऑफ सायंटिफिक ॲंड इंडस्ट्रिअल रिसर्चनें एक "गंधक कमिटी" नेमली आहे, परंतु तिचा उपयोग होईल असें वाटत नाहीं. वाया जाणाऱ्या कांहीं गॅसेसमधून गंधक काढण्याची इतर कित्येक देशांनीं अवलंबिलेली पद्धत हिंदुस्थानांत सुरू करण्यास हरकत नाहीं.

### युद्धविषयक मालाचें प्रदर्शन

हिंदी सरकारी दारूगोळ्यांच्या कारखान्यांत तयार होत असलेल्या मालाचें प्रदर्शन कानपूर येथें मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत भरवण्यांत येणार आहे. ह्या मालापैकीं कांहीं माल खासगी कारखान्यांत करतां आला, तर त्या मानानें सरकारी कारखान्यांवरील ताण कमी होईल, हा प्रदर्शन भरविण्याचा उद्देश आहे.

### भुइमुगाच्या लागवडीचें नियंत्रण

हिंदुस्थानांत भुइमुगाची लागवड मुख्यत: मद्रास व मुंबई प्रांत आणि हैद्राबाद संस्थान ह्यांमध्यें होते. हिंदुस्थान सरकार व हीं तीन सरकारें ह्यांच्या प्रतिनिधींची एक परिषद् दिल्ली येथें नुकतीच भरली होती. तिचेमध्यें भुइमुगाची किंमत आतां उतरली आहे, त्यास तोंड देण्याच्या प्रश्नाचा विचार झाला. भुइमुगाची लागवड मर्यादित करण्याचें परिषदेंत ठरलें. परंतु त्याची सक्ती करणें व्यवहार्य होणार नाहीं, असा परिषदेचा अभिप्राय झाला. शेतकऱ्यांस भुइमूग लावण्यापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्याचें ठरलें. उतरलेल्या बाजारभावामुळें भुइमुगाच्या लागवडीस पायबंद बसणार आहेच.

### ऑस्ट्रेलियाचें आगबोटींचें उत्पादन

आस्ट्रेलियानें मोठ्या प्रमाणावर आगबोटी बांधण्याची योजना हातीं घेतली आहे.

### कृत्रिम कॉफी

जर्मनीला नैसर्गिक कॉफी मिळणें अशक्य झालें असल्यामुळें ट्यूलिपच्या कांद्यांपासून कॉफी तयार करण्यास त्या देशानें प्रारंभ केला आहे. हॉलंडमध्यें लागणाऱ्या कॉफीसाठी त्या देशांत ट्यूलिपची लागवड वाढविण्यांत आली आहे. ह्या कांद्यांचे बारीक तुकडे करून ते भाजण्यांत येतात व त्यांत चिकरी मिसळली जाते. ह्या मिश्रणांत थोडी खरी कॉफी टाकली, कीं जर्मन कॉफी तयार होते.

### ट्रेझरी बिलांवर ११ आ. १ पै व्याज

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आ. १ पै इतका पडला.

### बी. बी. ॲंड सी. आय. चें डिव्हिडंड

बी. बी. ॲंड सी. आय. रेल्वेनें १९४०-४१ चें ७% दरानें डिव्हिडंड दिलें. डिव्हिडंड कर माफ नाहीं.

### औद्योगिक पुनर्घटना

युद्धसमाप्तीनंतर औद्योगिक घडी नीट कशी बसवावी, ह्याविषयींच्या प्रश्नांची चौकशी करण्याचें काम ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडच्या प्रेसिडेंटनें सर चार्लस इनिस ह्यांचेकडे सोंपविलें आहे.

### युद्धखर्च — प्रत्येक मृत्यूची किंमत

युद्धांत एक मनुष्य ठार करण्यास पूर्वी जितका खर्च येत असे, त्याच्या मानानें तो आतां कितीतरी पट येतो ! एका अमेरिकनानें ह्या खर्चाचा अंदाज केला आहे, तो खालीलप्रमाणें आहे:—

| | |
|---|---|
| सीझरचे युद्धांत | २¾ रुपये |
| नेपोलिअनिक युद्धांत | ८ हजार रुपये |
| अमेरिकन सिव्हिल वॉरमध्यें | १४ हजार रुपये |
| गेल्या महायुद्धांत | ६० हजार रुपये |
| चालू युद्धांत ( अंदाज ) | १½ लक्ष रुपये |

युद्धांतील दर माणशी मृत्यूचा खर्च इतका प्रचंड झाला असला, तरी हिटलरला ठार करण्यास ही किंमत कांहीं भारी नाहीं, असें त्या लेखकाचें म्हणणें आहे.

### इटालिअन युद्धकैदी

हिंदुस्थानांतील इटालिअन युद्धकैद्यांची संख्या १६ हजारांवर गेली आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ९८ |
| २ हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक | ९९ |
| ३ उत्पन्न–खर्चाचे आंकडे | १०० |
| ४ फळांच्या साठवणीचे प्रयोग | १०० |
| ५ स्फुट–विचार ... मध्यवर्ती सरकारच्या बजटाचा रागरंग—स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन—इकडील कारखान्यांच्या हितांचें संरक्षण—हिंदी लोकसंख्येची वाढ— | १०१ |
| ६ बँक ऑफ महाराष्ट्राची वार्षिक सभा ... | १०३ |
| ७ बँकेची पंचवार्षिक प्रगति | १०३ |
| ८ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | १०४ |
| ९ वाळवंटांतील मोटारी... | १०४ |
| १० रेल्वे बजेटावरील भाषण | १०५ |
| ११ आकडेशास्त्र म्हणजे काय? | १०५ |
| १२ निवडक बाजारभाव... | १०७ |

# अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी, १९४१

## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

हिंदी मध्यवर्ती असेंब्लीस वहातुक खात्याचे प्रमुख, सर ॲन्ड्र्यू क्लो, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत हिंदी सरकारी रेल्वेजचें १९४१-४२ चें अंदाजपत्रक सादर केलें. तें करतांना त्यांनीं चालू वर्षाचा आढावा घेतला व येत्या वर्षासंबंधींच्या अंदाजाचा तपशील सांगितला. गेल्या वर्षी केलेल्या अंदाजाप्रमाणें चालू वर्षी १०३ कोटि रुपये उत्पन्न होईल अशी अपेक्षा होती. तथापि तें उत्पन्न १०९ कोटि, २५ लक्षांवर जाईल, असा आजचा अजमास आहे. हा आकडा १९३९–४० च्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा ११¾ कोटि रुपयांनीं जास्त आहे. गेल्या वर्षी रेल्वेचे दर वाढविण्यांत आले, त्याचा हा प्रत्यक्ष परिणाम आहे. ह्या वाढलेल्या दरांचें वर्षअखेर जादा उत्पन्न ६¾ कोटि रुपयांवर जाईल. बाकीच्या अपेक्षित ५ कोटींच्या वाढाव्याचें कारण वहातुकींत झालेली प्रत्यक्ष वाढ, हें आहे. १९४०–४१ च्या हिशेबांतील वाढाव्यापैकी सुमारे १० कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास दिलें जातील. सध्याच्या विशिष्ट परिस्थितींत रेल्वेजच्या नफ्याचा उपयोग रिझर्व्ह वाढविण्याकडे करणें उचित होणार नाहीं; हा वाढावा जितक्या मोठ्या प्रमाणांत हिंदुस्थान सरकारास देतां येईल, त्या मानानें कर भरणारावरील ओझें सुसह्य होईल; असें सर ॲन्ड्र्यू ह्यांनीं सांगितलें. रेल्वेजच्या अंतिम भरभक्कमपणापेक्षा सरकारच्या जरूरीच्या नडीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे, हा त्याचा अर्थ आहे. हिंदी रेल्वेज व हिंदुस्थान सरकार ह्यांचेमधील १९२४ च्या कराराप्रमाणें व त्यानंतर रेल्वेजना दिलेल्या सवलतींस अनुसरून १९४०-४१ च्या १४ कोटि, ५९ लक्ष रुपये वाढाव्यापैकी ७ कोटि, १५ लक्ष रुपये सरकारास द्यावयास हवेत. म्हणजे, रेल्वेजवळ ७ कोटि, ४४ लक्ष रुपये उरतात. तथापि, सध्याची आणीबाणीची वेळ लक्षांत घेऊन, १९४२-४३ सालीं सरकारास द्यावयाच्या रकमेपैकी १ कोटि, ८२ लक्ष आतांच ॲडव्हान्स म्हणून देण्यांत यावयाचे आहेत. म्हणजे, ५ कोटि, ६२ लक्ष रुपये उरतात. हिंदी रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारास असलेलें देणें अंशतः भागविण्यासाठीं २ कोटि, ८१ लक्ष रुपयांचा विनियोग केला, म्हणजे रेल्वेजच्या स्वाधीन २ कोटि, ८१ लक्ष रुपये उरतात. चालू वर्षी खणून टाकलेल्या रेल्वेजमुळें जिंदगी कमी झाली आहे, ती हिशेबांतून कमी करण्यासाठीं १ कोटि रुपयांचा उपयोग केला जाणार आहे. म्हणजे, रेल्वे रिझर्व्हजच्या वाट्यास अखेर १ कोटि, ८१ लक्ष रुपये येतात. १९४०–४१ मध्यें हिंदुस्थान सरकारच्या वाट्यास ९ कोटि, ९६ लक्ष रुपये येतील व १९४१–४२ मध्यें, आगाऊ द्यावयाचे १ कोटि, ८२ लक्ष रुपये धरून, १० कोटि, १८ लक्ष रुपये येतील.

येत्या वर्षीच्या उत्पन्नाचा अंदाज चालू वर्षाच्या उत्पन्नाच्या अपेक्षेपेक्षा १ कोटि रुपयांनीं कमी धरण्यांत आला आहे. म्हणजे, येत्या वर्षी १०८¼ कोटि रुपयांचें उत्पन्न अपेक्षित आहे. ७८ लाखांचें किरकोळ उत्पन्न त्यांत मिळविलें म्हणजे उत्पन्नाची बेरीज १०९ कोटि, ३ लक्ष रुपये होते. चालू वर्षी रेल्वेचे दरांतील वाढ अंमलात आहे, तीमध्यें कोणताहि महत्त्वाचा फरक करण्यांत येणार नाहीं. रेल्वेज चालविण्याच्या खर्चाचा आकडा, घसारा धरून, ६८ कोटि, ६० लक्ष रुपये इतका अंदाजण्यांत आला आहे. म्हणजे, खर्च चालू वर्षातील प्रत्यक्ष खर्चाचे मानानें १ कोटि, ८९ लक्ष रुपयांनीं वाढणार आहे. खर्चाच्या आकड्यांत २८ कोटि, ६० लक्ष रुपये व्याजाचे मिळवले पाहिजेत. म्हणजे अपेक्षित खर्चाची रकम ९७ कोटि, २० लक्ष होते. अखेर, उत्पन्न-खर्चांत ११ कोटि, ८३ लक्ष रुपयांची अनुकूल तफावत पडेल, अशी अपेक्षा आहे. ह्या वाढाव्यांतून १९४१–४२ सालीं हिंदुस्थान सरकारास १० कोटि १८ लक्ष रुपये मिळतील व रेल्वेजच्या रिझर्व्हमध्यें ३ कोटि, ४७ लक्षांची भर पडेल.

चालू वर्षाच्या व येत्या वर्षाच्या दुरुस्त व कच्च्या अंदाजपत्रकांतील वरील आकड्यांवरून हिंदी रेल्वेजच्या सध्याच्या किफायतशीर कारभाराची कल्पना येईल. रेल्वेजना उरलेला मोठा नफा हा मुख्यतः रेल्वेजच्या दरांतील वाढीचा व युद्धजन्य जादा वहातुकीचा परिणाम आहे. रेल्वेजच्या कारभारांत आणखी काटकसर करण्यास भरपूर वाव आहे व दर वाढवून नफा दर्शविणें हें योग्य नाहीं, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. जितकी वहातुक वाढली, तिचे मानानें उत्पन्न अधिक वाढलें आहे. मालाच्या वहातुकीच्या दरांपासून चालू वर्षी बरेंच अधिक उत्पन्न झालें, हें हिंदी जनतेच्या आर्थिक उत्कर्षाचें एक लक्षण आहे, असें सर ॲन्ड्र्यू क्लो म्हणाले. परंतु हिंदी लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारली असल्याचा हा दाखला मान्य करण्यापूर्वी इतर बाबींचाहि विचार केला पाहिजे. रेल्वेजवरील वहातुक वाढण्यास समुद्रावरील आगबोटींची अंशतः बंद पडलेली वहातुकहि कारणीभूत झाली आहे व मोटारी आणि रेल्वेज ह्यांमधील स्पर्धा कमी करण्याचें सरकारचें पद्धतशीर धोरण अमलांत आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. हिंदी निर्गत युद्धपरिस्थितीमुळें थोडी कमी झाली तरी युद्धविषयक मालाच्या वहातुकीमुळें रेल्वेजचें उत्पन्न कमी न होतां तें वाढलेलें आढळतें. ह्यापुढें, ही वहातुक आणखी वाढेल व रेल्वेजना अधिक उत्पन्न मिळेल, अशींच लक्षणें दिसत आहेत. अशा परिस्थितींत पुष्कळ वेळां काटकसरीकडे दुर्लक्ष होतें व न कळत फुगत चाललेला खर्च वाढत्या उत्पन्नास खाऊन टाकतो. युद्धसमाप्तीनंतर दुरुस्तीची व नव्या खरेदीची आवश्यकता एकदम उत्पन्न होते, त्याची तरतूद वेळींच केली जाणें आवश्यक असतें. ह्या सर्व प्रश्नांकडे काळजीपूर्वक लक्ष देणें अगत्याचें आहे.

## सरकारी रेल्वेजच्या उत्पन्न–खर्चाचे आंकडे

| उत्पन्न | लक्ष रुपये | | | |
|---|---|---|---|---|
| | पक्के १९३९-४० | १९४०-४१ अंदाज | १९४०-४१ दुरुस्त अंदाज | अंदाज १९४१-४२ |
| **वहातुकीचें उत्पन्न** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ९७,६५ | १,०३,०० | १,०५,२५ | १,०८,२५ |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | ५,०८ | ५,१९ | ५,४७ | ५,५३ |
| **रेल्वेजचा खर्च** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ६४,८५ | ६६,६४ | ६६,७१ | ६८,६० |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | २,५१ | २,६२ | २,५६ | २,६२ |
| चालविलेल्या रेल्वेजना द्यावयाची रक्कम | २,५७ | २,५७ | २,९१ | २,९१ |
| (अ) वहातुकीचें निवळ उत्पन्न | ३२,८० | ३६,३६ | ४२,५४ | ३९,६५ |
| **इतर** | | | | |
| इतर उत्पन्न | १,७१ | १,९६ | १,९९ | २,२४ |
| इतर खर्च | १,०७ | १,२१ | १,२० | १,४६ |
| (ब) इतर निवळ उत्पन्न | ६४ | ७५ | ७९ | ७८ |
| अ+ब निवळ उत्पन्न | ३३,४४ | ३७,११ | ४३,३३ | ४०,४३ |
| व्याज देणें | २९,११ | २८,८२ | २८,७४ | २८,६० |
| वाढावा | ४,३३ | ८,२९ | १४,५९ | ११,८३ |

## प्राप्तीवरील करासंबंधीं एक निवाडा

### सॉलिसिटरला मिळालेली देणगी

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग एजंट मेसर्स मार्टिन आणि कंपनी, हे एका नवीन पोलादाच्या उत्पादनाचे कंपनीविषयीं वाटाघाट करीत होते. त्या संबंधांत श्री. सुशीलचंद्र सेन, कलकत्ता येथील सॉलिसिटर, ह्यांस श्री. खांडवाल ( कंपनीचे एक भागीदार ) ह्या आपल्या अशिलातर्फे कंपनीच्या सभेस हजर रहावें लागलें. श्री. सेन ह्यांस मार्टिन आणि कंपनीच्या भागीदारांसहि भेटावें लागलें. अखेर, एक योजना उभयपक्षी संमत झाली, त्यामुळें त्यांच्या अशिलाची बाजू ५०% उचलून धरली गेली. इतरहि भागीदारांचा पुष्कळ नफा झाला व त्यांचेतर्फे कोणीतरी श्री. सेन ह्यांस १० हजार रुपये देणगी म्हणून दिले. ह्या रकमेवर प्राप्तीवरील कर घेतला जाऊं नये, ती केवळ देणगी आहे, असें श्री. सेन ह्यांचें म्हणणें होतें. बंगालच्या कमिशनर ऑफ इन्कम् टॅक्सनें हा प्रश्न हायकोर्टाकडे सोपविला. "ह्या प्रकरणांत श्री. सेन ह्यांस मिळालेले पैसे हे त्यांच्या धंद्यांतील वेतनाचेच आहेत; ते स्वतः सॉलिसिटर नसते, तर त्यांस ती रकम मिळाली नसती." असें कमिशनर ऑफ इन्कम् टॅक्सचें म्हणणें होतें, तें हायकोर्टानें मान्य केलें.

### अँग्लो इंडियनांस जादा पगार

रेल्वेवरील ज्या जागेच्या नोकरास तो हिंदी असल्यास सुरवातीस २० ते ३० रुपये दिले जातात, तोच अँग्लो इंडिअन असल्यास त्यास ५५ रुपये दिले जातात, हें खरें आहे काय? असा प्रश्न डॉ. सर झिआउद्दिन अहमद् ह्यांनीं असेंब्लींत विचारला, त्यास उत्तर देतांना रेल्वे मेंबर सर ॲन्ड्र्यू क्लो ह्यांनीं हिंदी राज्यघटनेच्या कायद्याच्या २४२ व्या कलमाचा आधार दाखविला. "कस्टम्स, पोस्ट आणि तार खातें, ह्यांमधील नोकरभरतीचेवेळीं नियम करतांना अँग्लो इंडियन जातीचा त्या खात्याशीं आजवर असलेला निकट संबंध, त्या जातीचे लोकांकडे असलेल्या जागांचा दर्जा व त्यांची संख्या, आणि त्यांस पूर्वी मिळत असलेला पगार ह्या सर्वांचा विचार करण्यांत यावा." असें तें कलम आहे. युरोपिअन्सना हिंदुस्थानांत काम करण्याबद्दल "ओव्हर सीज्" भत्ता मिळतो. मौलाना झाफर अलीखान ह्यांनीं, "मुसलमानांच्या रहाणीचें मानहि अँग्लो इंडिअनांप्रमाणेंच उच्च आहे कीं नाहीं?" असा प्रश्न विचारला, त्यावर "कोणत्याच जातीच्या रहाणीचे मानाविषयीं मला मत देतां येणार नाहीं" असें सर ॲन्ड्र्यू क्लो हे म्हणाले.

## फळांच्या साठवणीचे प्रयोग–कोल्ड स्टोरेज

हिंदी फळ व भाज्या ह्यांची थंड हवेंत कशा रीतीनें साठवण करतां येईल व ती किफायतशीर होईल किंवा नाहीं ह्यासंबंधीं संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या पैशानें गणेशखिंड येथील मुंबई सरकारच्या बागेंतील कोल्ड स्टोरेज मध्यें चालू आहे, त्यास आतां सात वर्षें होतील. ह्या योजनेस एप्रिल, १९४२ अखेर इंपीरियल कौंसिलची मंजुरी मिळालेली आहे. १९३९–४० मध्यें केलेल्या प्रयोगांचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे:—

**हापूस आंबे:**—६८° फॅ. उष्णतामानांत विरळ हवेंत आंबे ठेवले असतां ते अधिक सावकाश पिकतात. ५२° फॅ. उष्णतामानांत पिकलेले आंबे ठेवले, तेव्हां कोईजवळ येणारा तांबुसपणा आढळला नाहीं व फळें एक महिना चांगलीं टिकलीं.

**नागपुरी संत्रीं:**—५२° फॅ. व ४०° फॅ. उष्णतामानांत तीन महिने ठेवलेल्या ह्या संत्र्यांतील 'सी' व्हिटॅमिन ( ओज द्रव्य ) नाहींसें झालें नाहीं. तीन महिन्यानंतर हीं संत्रीं रेल्वेनें नागपूरला पाठविलीं, तेव्हां फळांच्या रसास थोडा अंबुस वास येऊं लागला. ह्याचा अर्थ, हीं फळें पाठविण्यास कमी उष्णतामान कायम राखणारे डबे पाहिजेत.

**राजेळी केळीं:**—५२° फॅ. उष्णतामानांत वसईचीं केळीं गारठलीं, परंतु ५६° फॅ. ला दोन-तीन आठवड्यांनीं तीं पिकलीं. पिकल्यानंतर तीं तीन चार दिवसांपेक्षा अधिक टिकलीं नाहींत; त्यांच्या पिवळ्या सालीवर तांबुस ठिपके दिसूं लागले, व केळीं घडाच्या दांड्यापासून विभक्त होऊं लागलीं. सुटीं केळीं अथवा त्यांच्या फण्या कोल्ड स्टोरेजमध्यें ठेवल्या, त्यांच्या देठाशीं बुरसा आला. देठाशीं व्हॅसेलिन व पातळ मेण ह्यांचें मिश्रण लावलें, तेव्हां बुरसा थांबला.

**इतर फळें:**—काश्मिरी सफरचंदें चार महिने ३२° फॅ. मध्यें उत्कृष्ट टिकलीं. तयार अंजीर ३२° फॅ. व ३५° फॅ. उष्णतामानांत एक महिना चांगले टिकले. ६८° फॅ. उष्णतामान पोपयांस चाललें नाहीं. ५२° फॅ. मध्यें कागदी लिंबें दोन महिने चांगलीं राहिलीं. कच्चे टामाटू ५२° फॅ. ला पिकले व एका महिन्यांत त्यांस चांगला रंग भरला.

## स्फुट विचार

### मध्यवर्ती सरकारच्या बजेटाचा रागरंग

दरवर्षी ह्या वेळेच्या सुमारास हिंदुस्थान सरकारचें पुढील सालाबाबतचें उत्पन्न–खर्चाचें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदे मंडळास सादर होण्याचा प्रसंग जवळ आला असतां त्यामध्यें कोणत्या विशेष बाबी अंतर्भूत झालेल्या असतील ह्याविषयीं लोकांमध्यें कुतूहल उत्पन्न होऊन त्यांचे तर्क चालू होतात. सध्याच्या युद्धकाळांत सरकारच्या तिजोरींत निवळ शिलकी उत्पन्नाची भर पडण्याची अपेक्षा असणें संभवनीय नाहीं, ह्यामुळें वाढाव्याचा उपयोग कसा केला जातो ह्याचा मामुली परिस्थितींतल्याप्रमाणें विचार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. उलट, युद्धखर्च वाढता असणार आणि तो भागवण्यास पुरा पडेल इतका वाढावा उत्पन्नांत होणार नाहीं ह्याची स्पष्ट कल्पना लोकांस असते. ह्याकरितां उत्पन्न–खर्चांतली तफावत भरून काढण्यास फडनवीस कोणते उपाय योजतात ह्याच्या अंदाजाचा खेळ ते खेळतात. हा कर वाढतो, का तो कर वाढतो ह्याविषयीं केवळ तर्क करण्यापेक्षां त्यांच्या कल्पनेची अधिक मजल जात नाहीं. रेलवेजचें अंदाजपत्रक कांहीं दिवस अगोदर प्रसिद्ध झालेलें असल्यानें त्यावरून दिसून येणारी मध्यवर्ती तिजोरीस व्हावयाची प्राप्ती तेवढी कळलेली असते. जनतेच्या तर्कास आधार म्हटला म्हणजे सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नऊ महिन्यांच्या उत्पन्न–खर्चाच्या आकड्यांचाच तेवढा असतो. गेल्या डिसेंबर महिन्यांत उत्पन्नाच्या प्रमुख बाबींचा वसूल पूर्वीच्या वर्षाच्या ह्याच महिन्याचे मानानें तीन कोटि रुपयांनीं कमी झाला, पण खर्च मात्र एक कोटीनें वाढला. चालू वर्षाचे पहिले नऊ महिने घेतले तर उत्पन्न पूर्व सालाच्या त्याच नऊ महिन्याच्या मानानें आठ कोटि रुपयांनीं घटलें असें दिसून येतें. ह्यापैकीं बहुतेक म्हणजे सात कोटि इतकी घट कस्टम्सच्या वसुलीमध्यें झाली. ह्या नऊ महिन्यांत खर्च नऊ कोटींनीं वाढला आणि ह्या वाढाव्याचें कारण संरक्षण खात्यावर झालेला जादा खर्च हें होय. चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत कायमच्या कर्जांत १५ कोटि रुपयांची वाढ झाली. युद्धकर्जाचा पैसा सरकारकडे येत असला तरी १९४०–४३ सालांच्या मुदतीच्या कर्जरोख्यांची गेल्या सप्टेंबर महिन्यांत परतफेड करण्यांत आल्यामुळें १९ कोटि रुपये जनतेस द्यावे लागले. सबंद वर्षाच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज करतां रेलवेज, पोस्ट इत्यादि बाबींची जमा पूर्वीच्या वर्षाचे मानानें व अंदाजपत्रकाशीं तुलना करतां अधिक असली तरी सर्व खात्यांच्या हिशेबाअंतीं तूट येणें अपरिहार्य आहे. लष्करी खर्च वाढत्या प्रमाणांत असल्यानें उत्पन्नाची बाजू बळकट करण्याकडे फडनवीसांस लक्ष पुरवणें प्राप्त आहे. उत्पन्नांत किती वाढ आवश्यक आहे आणि ते कोणत्या बाबींतून हा वाढावा काढण्याचें योजतात हें लवकरच दिसेल. उद्योगधंदे व व्यापार ह्यांस बाधक होणार नाहीं अशीच कर योजना त्यांनीं करावयास पाहिजे. युद्धपरिस्थितीमुळें ज्यांस जादा फायदा होत असेल, त्यांचेकडून योग्य प्रमाणांत वाढाव्याचा अंश सरकारी तिजोरीनें घेणें गैर होणार नाहीं. सामान्य जनतेच्या सांपत्तिक स्थितीवर मात्र प्रतिकूल परिणाम होणार नाहीं असें करांचें धोरण असावयास पाहिजे. हें तत्त्व फडनवीस ध्यानांत बाळगतील अशी आशा आहे. कारण देशांतील व बाहेरील एकंदर युद्ध परिस्थिति आणि सरकारी तिजोरीच्या निकडीच्या गरजा ह्यांचा मेळ त्यांस घालावा लागेल.

———

### स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन ?

निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें साखरेच्या कारखान्यांचा विस्तार झाला आहे आणि होत आहे. त्याचें नियंत्रण मध्यवर्ती सरकारानें किंवा दुसऱ्या एखाद्या अखिल भारतीय अधिकारी संस्थेनें करावें, नाहीं तर ह्या स्वदेशी धंद्याची धडगत नाहीं अशा आशयाची ओरड संयुक्त प्रांत व बिहार येथील हितसंबंधी लोकांनीं चालविली असल्याचें आम्हीं "अर्था"च्या मागील एका अंकांत दर्शवलें होतें. ह्या तक्रारीला आतां स्पष्टपणानें आणि अधिकारी रीतीनें आतां तोंड फुटलें आहे. साखरेच्या धंद्याचें नियमन करणाऱ्या इंडिअन शुगर सिंडिकेट ह्या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आंबेगांवकर, ह्यांनीं तिच्या नियामक मंडळानें केलेले ठराव हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी व फडनिशी खात्यांकडे पाठवले आहेत आणि त्यांत अशी विनंति केली आहे कीं, अखिल भारतीय स्वरूपाच्या नियंत्रणाखालीं हिंदी साखरेचा धंदा आणला जावा आणि हें शक्य न झाल्यास संयुक्तप्रांत व बिहार ह्यांच्या बाहेरील कारखानदारांस अखिल भारतीय विक्रीसंघाचे सभासद होण्यास भाग पाडावें. स्वदेशी साखरेस सध्या मिळत असलेलें संरक्षण कमी करण्यांत यावें आणि अडचणीच्या वेळीं तें वाढवण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घ्यावा अशीहि सूचना सिंडिकेटनें केली आहे. उत्तर हिंदुस्थानाच्याबाहेर साखरेच्या कारखान्याचा अनियंत्रित रीतीनें विस्तार झाला आहे त्याचे परिणाम देशी साखरेच्या व उंसाच्या धंद्यास घातुक झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील कारखान्यांवर प्रांतिक सरकारांनीं नियंत्रण घातलें आहे, पण इतरत्र त्याचा अभाव असल्यानें साखरेचें उत्पादन भरमसाटपणानें चालून साखरेच्या किंमती पडल्या आहेत आणि सबंद राष्ट्रीय धंद्यावर संकट ओढवलें आहे. हा वर निर्दिष्ट केलेल्या ठरावांतील मुख्य मुद्दा आहे. सरकारनें दिलेल्या संरक्षणामुळें स्वदेशी साखरेचा धंदा वाढला असल्यानें त्याचें नुकसान व अंतिम नाश होणार नाहीं, त्याविषयीं वेळींच खबरदारी घेणें हें त्यांचें काम आहे असें त्यांस निक्षून सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारावर हें जबाबदारीचें ओझें टाकण्याचें कारण संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं उंसाच्या व साखरेच्या किंमतींच्या नियमनाचा त्या धंद्यांच्या स्थैर्याच्या दृष्टीनें चालवलेला प्रयत्न हें होय. तेथील परिस्थितींत इतर प्रांतांतील कारखानदार व सरकार ह्यांनीं अंशभागी व्हावें अशी त्या प्रांतांतील हितसंबंधी धंदेवाल्यांची इच्छा आहे आणि स्वतःचा उद्देश हिंदुस्थान सरकारचे मार्फत सिद्ध करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

———

### इकडील कारखान्यांच्या हिताचें संरक्षण

हिंदुस्थानांतील १४५ साखर कारखान्यांपैकीं १०६ कारखाने इंडियन शुगर सिंडिकेटचे सभासद आहेत. गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत साखरेची किंमत दर मणास अडीच रुपये ह्याप्रमाणें उतरवली गेल्यामुळें त्या संस्थेच्या अनेक सभासद कारखान्यांचा माल विकणें अशक्य होऊन सिंडिकेटच्या डोक्यावर त्यांचें देणें होऊन बसलें. हा बोजा हलका करण्याच्या प्रयत्नांस अजून यश आलेलें नाहीं. आणि सिंडिकेट ही संस्था गुंडाळण्यांत यावी कीं काय ह्या प्रश्नाचीहि चर्चा झाली आहे. असल्या प्रयत्नांत पैशाचा व काळाचा अपव्यय होऊन त्याचा कोणासच उपयोग होणार नाहीं असें सर्व साधारण मत व्यक्त करण्यांत

## सरकारी रेल्वेजच्या उत्पन्न-खर्चाचे आंकडे

| उत्पन्न | लक्ष रुपये | | | |
|---|---|---|---|---|
| | पक्के १९३९-४० | १९४०-४१ अंदाज | १९४०-४१ दुरुस्त अंदाज | अंदाज १९४१-४२ |
| **वहातुकीचें उत्पन्न :** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ९७,६५ | १,०३,०० | १,०९,२५ | १,०८,२५ |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | ५,०८ | ५,१९ | ५,४७ | ५,५३ |
| **रेल्वेजचा खर्च** | | | | |
| सरकारी रेल्वेज | ६४,८५ | ६६,६४ | ६६,७१ | ६८,६० |
| सरकारनें चालविलेल्या रेल्वेज | २,५१ | २,६२ | २,५६ | २,६२ |
| चालविलेल्या रेल्वेजना द्यावयाची रक्कम | २,५७ | २,५७ | २,९१ | २,९१ |
| (अ) वहातुकीचें निवळ उत्पन्न | ३२,८० | ३६,३६ | ४२,५४ | ३९,६५ |
| **इतर** | | | | |
| इतर उत्पन्न | १,७१ | १,९६ | १,९९ | २,२४ |
| इतर खर्च | १,०७ | १,२१ | १,२० | १,४६ |
| (ब) इतर निवळ उत्पन्न | ६४ | ७५ | ७९ | ७८ |
| अ+ब निवळ उत्पन्न | ३३,४४ | ३७,११ | ४३,३३ | ४०,४३ |
| व्याज देणें | २९,११ | २८,८२ | २८,७४ | २८,६० |
| वाढावा | ४,३३ | ८,२९ | १४,५९ | ११,८३ |

## प्राप्तीवरील करासंबंधीं एक निवाडा

### सॉलिसिटरला मिळालेली देणगी

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीचे मॅनेजिंग एजंट मेसर्स मार्टिन आणि कंपनी, हे एका नवीन पोलादाच्या उत्पादनाचे कंपनीविषयीं वाटाघाट करीत होते. त्या संबंधांत श्री. सुशीलचंद्र सेन, कलकत्ता येथील सॉलिसिटर, ह्यांस श्री. खांडवाल ( कंपनीचे एक भागीदार ) ह्या आपल्या अशिलातर्फे कंपनीच्या सभेस हजर रहावें लागलें. श्री. सेन ह्यांस मार्टिन आणि कंपनीच्या भागीदारांसहि भेटावें लागलें. अखेर, एक योजना उभयपक्षीं संमत झाली, त्यामुळें त्यांच्या अशिलाची बाजू ५०% उचलून धरली गेली. इतरहि भागीदारांचा पुष्कळ नफा झाला व त्यांचेतर्फे कोणीतरी श्री. सेन ह्यांस १० हजार रुपये देणगी म्हणून दिले. ह्या रकमेवर प्राप्तीवरील कर घेतला जाऊं नये, ती केवळ देणगी आहे, असें श्री. सेन ह्यांचें म्हणणें होतें. बंगालच्या कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सनें हा प्रश्न हायकोर्टाकडे सोपविला. "ह्या प्रकरणांत श्री. सेन ह्यांस मिळालेले पैसे हे त्यांच्या धंद्यांतील वेतनाचेच आहेत; ते स्वत: सॉलिसिटर नसते, तर त्यांस ती रकम मिळाली नसती." असें कमिशनर ऑफ इन्कम टॅक्सचें म्हणणें होतें, तें हायकोर्टानें मान्य केलें.

### अँग्लो इंडियनांस जादा पगार

रेल्वेवरील ज्या जागेच्या नोकरास तो हिंदी असल्यास सुरवातीस २० ते ३० रुपये दिले जातात, तोच अँग्लो इंडिअन असल्यास त्यास ५५ रुपये दिले जातात, हें खरें आहे काय ? असा प्रश्न डॉ. सर झिआउद्दिन अहमद ह्यांनीं असेंब्लींत विचारला, त्यास उत्तर देतांना रेल्वे मेंबर सर अॅन्ड्र्यू क्लो ह्यांनीं हिंदी राज्यघटनेच्या कायद्याच्या २४२ व्या कलमाचा आधार दाखविला. "कस्टम्स, पोस्ट आणि तार खातें, ह्यांमधील नोकरभरतीचेवेळीं नियम करतांना अँग्लो इंडियन जातीचा त्या खात्याशीं आजवर असलेला निकट संबंध, त्या जातीचे लोकांकडे असलेल्या जागांचा दर्जा व त्यांची संख्या, आणि त्यांस पूर्वी मिळत असलेला पगार ह्या सर्वांचा विचार करण्यांत यावा." असें तें कलम आहे. युरोपिअन्सना हिंदुस्थानांत काम करण्याबद्दल "ओव्हर सीज्" भत्ता मिळतो. मौलाना झफर अलीखान ह्यांनीं, "मुसलमानांच्या रहाणीचें मानहि अँग्लो इंडिअनांप्रमाणेंच उच्च आहे कीं नाहीं ?" असा प्रश्न विचारला, त्यावर "कोणत्याच जातीच्या रहाणीचे मानाविषयीं मला मत देतां येणार नाहीं" असें सर अॅन्ड्र्यू क्लो हे म्हणाले.

## फळांच्या साठवणीचे प्रयोग-कोल्ड स्टोरेज

हिंदी फळ व भाज्या ह्यांची थंड हवेंत कशा रीतीनें साठवण करतां येईल व ती किफायतशीर होईल किंवा नाहीं ह्यासंबंधीं संशोधन इंपीरिअल कौन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्चच्या पैशानें गणेशखिंड येथील मुंबई सरकारच्या बागेंतील कोल्ड स्टोरेज मध्यें चालू आहे, त्यास आतां सात वर्षे होतील. ह्या योजनेस एप्रिल, १९४२ अखेर इंपीरियल कौन्सिलची मंजुरी मिळालेली आहे. १९३९–४० मध्यें केलेल्या प्रयोगांचा निष्कर्ष खालीलप्रमाणें आहे:—

**हापूस आंबे:**—६८° फॅ. उष्णतामानांत विरळ हवेंत आंबे ठेवले असतां ते अधिक सावकाश पिकतात. ५२° फॅ. उष्णतामानांत पिकलेले आंबे ठेवले, तेव्हां कोईजवळ येणारा तांबुसपणा आढळला नाहीं व फळें एक महिना चांगलीं टिकलीं.

**नागपुरी संत्रीं:**—५२° फॅ. व ४०° फॅ. उष्णतामानांत तीन महिने ठेवलेल्या ह्या संत्र्यांतील 'सी' व्हिटॅमिन ( ओज द्रव्य ) नाहींसें झालें नाहीं. तीन महिन्यानंतर हीं संत्रीं रेल्वेनें नागपूरला पाठविलीं, तेव्हां फळांच्या रसास थोडा अंबुस वास येऊं लागला. ह्याचा अर्थ, हीं फळें पाठविण्यास कमी उष्णतामान कायम राखणारे डबे पाहिजेत.

**राजेळी केळीं:**—५२° फॅ. उष्णतामानांत वसईचीं केळीं मारठलीं, परंतु ५६° फॅ. ला दोन-तीन आठवड्यांनीं तीं पिकलीं. पिकल्यानंतर तीं तीन चार दिवसांपेक्षा अधिक टिकलीं नाहींत; त्यांच्या पिवळ्या सालीवर तांबुस ठिपके दिसूं लागले, व केळीं घडाच्या दांड्यापासून विभक्त होऊं लागलीं. सुटीं केळीं अथवा त्यांच्या फण्या कोल्ड स्टोरेजमध्यें ठेवल्या, त्यांच्या देठाशीं बुरसा आला. देठाशीं व्हॅसेलिन व पातळ मेण ह्यांचें मिश्रण लावलें, तेव्हां बुरसा थांबला.

**इतर फळें:**—काश्मिरी सफरचंदें चार महिने ३२° फॅ. मध्यें उत्कृष्ट टिकलीं. तयार अंजीर ३२° फॅ. व ३५° फॅ. उष्णतामानांत एक महिना चांगले टिकले. ६८° फॅ. उष्णतामान पोपयांस चाललें नाहीं. ५२° फॅ. मध्यें कागदी लिंबें दोन महिने चांगलीं राहिलीं. कच्चे टामाटू ५२° फॅ. ला पिकले व एका महिन्यांत त्यास चांगला रंग भरला.

# स्फुट विचार

## मध्यवर्ती सरकारच्या बजेटाचा रागरंग

दरवर्षीं ह्या वेळेच्या सुमारास हिंदुस्थान सरकारचें पुढील सालाबाबतचें उत्पन्न-खर्चाचें अंदाजपत्रक मध्यवर्ती कायदे मंडळास सादर होण्याचा प्रसंग जवळ आला असतां त्यामध्यें कोणत्या विशेष बाबी अंतर्भूत झालेल्या असतील ह्याविषयीं लोकांमध्यें कुतूहल उत्पन्न होऊन त्यांचे तर्क चालू होतात. सध्याच्या युद्धकाळांत सरकारच्या तिजोरींत निवळ शिलकी उत्पन्नाची भर पडण्याची अपेक्षा असणें संभवनीय नाहीं, ह्यामुळें वाढाव्याचा उपयोग कसा केला जातो ह्याचा मामुली परिस्थितींतल्याप्रमाणें विचार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. उलट, युद्धखर्च वाढता असणार आणि तो भागवण्यास पुरा पडेल इतका वाढावा उत्पन्नांत होणार नाहीं ह्याची स्पष्ट कल्पना लोकांस असते. ह्याकरितां उत्पन्न-खर्चांतली तफावत भरून काढण्यास फडनवीस कोणते उपाय योजतात ह्याच्या अंदाजाचा खेळ ते खेळतात. हा कर वाढतो, का तो कर वाढतो ह्याविषयीं केवळ तर्क करण्यापेक्षां त्यांच्या कल्पनेची अधिक मजल जात नाहीं. रेलवेजचें अंदाजपत्रक कांहीं दिवस अगोदर प्रसिद्ध झालेलें असल्यानें त्यावरून दिसून येणारी मध्यवर्ती तिजोरीस व्हावयाची प्राप्ती तेवढी कळलेली असते. जनतेच्या तर्कास आधार म्हटला म्हणजे सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नऊ महिन्यांच्या उत्पन्न-खर्चाच्या आकड्यांचाच तेवढा असतो. गेल्या डिसेंबर महिन्यांत उत्पन्नाच्या प्रमुख बाबींचा वसूल पूर्वीच्या वर्षाच्या ह्याच महिन्याचे मानानें तीन कोटि रुपयांनीं कमी झाला, पण खर्च मात्र एक कोटीनें वाढला. चालू वर्षाचे पहिले नऊ महिने घेतले तर उत्पन्न पूर्व सालाच्या त्याच नऊ महिन्याच्या मानानें आठ कोटि रुपयांनीं घटलें असें दिसून येतें. ह्यापैकीं बहुतेक म्हणजे सात कोटि इतकी घट कस्टम्सच्या वसुलीमध्यें झाली. ह्या नऊ महिन्यांत खर्च नऊ कोटींनीं वाढला आणि ह्या वाढाव्याचें कारण संरक्षण खात्यावर झालेला जादा खर्च हें होय. चालू वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांत कायमच्या कर्जांत १५ कोटि रुपयांची वाढ झाली. युद्ध कर्जाचा पैसा सरकारकडे येत असला तरी १९४०-४३ सालांच्या मुदतीच्या कर्जरोख्यांची गेल्या सप्टेंबर महिन्यांत परतफेड करण्यांत आल्यामुळें १९ कोटि रुपये जनतेस द्यावे लागले. संबंद वर्षाच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज करतां रेलवेज, पोस्ट इत्यादि बाबींची जमा पूर्वीच्या वर्षाचे मानानें व अंदाजपत्रकाशीं तुलना करतां अधिक असली तरी सर्व खात्यांच्या हिशेबाअंतीं तूट येणें अपरिहार्य आहे. लष्करी खर्च वाढत्या प्रमाणांत असल्यानें उत्पन्नाची बाजू बळकट करण्याकडे फडनवीसांस लक्ष पुरवणें प्राप्त आहे. उत्पन्नांत किती वाढ आवश्यक आहे आणि ते कोणत्या बाबींतून हा वाढावा काढण्याचें योजतात हें लवकरच दिसेल. उद्योगधंदे व व्यापार ह्यांस बाधक होणार नाहीं अशीच कर योजना त्यांनीं करावयास पाहिजे. युद्धपरिस्थितीमुळें ज्यांस जादा फायदा होत असेल, त्यांचेकडून योग्य प्रमाणांत वाढाव्याचा अंश सरकारी तिजोरीनें घेणें गैर होणार नाहीं. सामान्य जनतेच्या सांपत्तिक स्थितीवर मात्र प्रतिकूल परिणाम होणार नाहीं असें करांचें धोरण असावयास पाहिजे. हें तत्त्व फडनवीस ध्यानांत बाळगतील अशी आशा आहे. कारण देशांतील व बाहेरील एकंदर युद्ध परिस्थिति आणि सरकारी तिजोरीच्या निकडीच्या गरजा ह्यांचा मेळ त्यांस घालावा लागेल.

———

## स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियमन ?

निरनिराळे प्रांत आणि संस्थानें ह्यांचेमध्यें साखरेच्या कारखान्यांचा विस्तार झाला आहे आणि होत आहे. त्याचें नियंत्रण मध्यवर्ती सरकारानें किंवा दुसऱ्या एखाद्या अखिल भारतीय अधिकारी संस्थेनें करावें, नाहीं तर ह्या स्वदेशी धंद्याची धडगत नाहीं अशा आशयाची ओरड संयुक्त प्रांत व बिहार येथील हितसंबंधी लोकांनीं चालविली असल्याचें आम्हीं "अर्था"च्या मागील एका अंकांत दर्शविलें होतें. ह्या तक्रारीला आतां स्पष्टपणानें आणि अधिकारी रीतीनें आतां तोंड फुटलें आहे. साखरेच्या धंद्याचें नियमन करणाऱ्या इंडिअन शुगर सिंडिकेट ह्या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आंबेगांवकर, ह्यांनीं तिच्या नियामक मंडळानें केलेले ठराव हिंदुस्थान सरकारच्या व्यापारी व फडनिशी खात्यांकडे पाठवले आहेत आणि त्यांत अशी विनंति केली आहे कीं, अखिल भारतीय स्वरूपाच्या नियंत्रणाखाली हिंदी साखरेचा धंदा आणला जावा आणि हें शक्य न झाल्यास संयुक्तप्रांत व बिहार ह्यांच्या बाहेरील कारखानदारांस अखिल भारतीय विक्रीसंघाचे सभासद होण्यास भाग पाडावें. स्वदेशी साखरेस सध्या मिळत असलेलें संरक्षण कमी करण्यांत यावें आणि अडचणीच्या वेळीं तें वाढवण्याचा अधिकार सरकारनें स्वतःकडे घ्यावा अशीहि सूचना सिंडिकेटनें केली आहे. उत्तर हिंदुस्थानाच्याबाहेर साखरेच्या कारखान्याचा अनियंत्रित रीतीनें विस्तार झाला आहे त्याचे परिणाम देशी साखरेच्या व उंसाच्या धंद्यास घातुक झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. संयुक्तप्रांत आणि बिहार येथील कारखान्यांवर प्रांतिक सरकारांनीं नियंत्रण घातलें आहे, पण इतरत्र त्याचा अभाव असल्यानें साखरेचें उत्पादन भरमसाटपणानें चालून साखरेच्या किंमती पडल्या आहेत आणि सबंद राष्ट्रीय धंद्यावर संकट ओढवलें आहे. हा वर निर्दिष्ट केलेल्या ठरावांतील मुख्य मुद्दा आहे. सरकारनें दिलेल्या संरक्षणामुळें स्वदेशी साखरेचा धंदा वाढला असल्यानें त्याचें नुकसान व अंतिम नाश होणार नाहीं, त्याविषयीं वेळींच खबरदारी घेणें हें त्यांचें काम आहे असें त्यांस निक्षून सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थान सरकारावर हें जबाबदारीचें ओझें टाकण्याचें कारण संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं उंसाच्या व साखरेच्या किंमतींच्या नियमनाचा त्या धंद्यांच्या स्थैर्याच्या दृष्टीनें चालवलेला प्रयत्न हें होय. तेथील परिस्थितींत इतर प्रांतांतील कारखानदार व सरकार ह्यांनीं अंशभागी व्हावें अशी त्या प्रांतांतील हितसंबंधी धंदेवाल्यांची इच्छा आहे आणि स्वतःचा उद्देश हिंदुस्थान सरकारचे मार्फत सिद्ध करून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

———

## इकडील कारखान्यांच्या हिताचें संरक्षण

हिंदुस्थानांतील १४५ साखर कारखान्यांपैकीं १०६ कारखाने इंडियन शुगर सिंडिकेटचे सभासद आहेत. गेल्या वर्षाच्या जून महिन्यांत साखरेची किंमत दर मणास अडीच रुपये ह्याप्रमाणें उतरवली गेल्यामुळें त्या संस्थेच्या अनेक सभासद कारखान्यांचा माल विकणें अशक्य होऊन सिंडिकेटच्या डोक्यावर त्यांचें देणें होऊन बसलें. हा बोजा हलका करण्याच्या प्रयत्नांस अजून यश आलेलें नाहीं. आणि सिंडिकेट ही संस्था गुंडाळण्यांत यावी कीं काय ह्या प्रश्नाचीहि चर्चा झाली आहे. असल्या प्रयत्नांत पैशाचा व काळाचा अपव्यय होऊन त्याचा कोणासच उपयोग होणार नाहीं असें सर्व साधारण मत व्यक्त करण्यांत

आलें आहे. गेल्या वर्षांतील एप्रिल ११ च्या अखेर पुऱ्या झालेल्या मुदतींतील शिल्लक साखरेपैकीं सुमारें निम्म्या मालाची किंमत दर मणास साडेतीन रुपये ह्या दरानें कमी करून ती निकालांत काढावी अशी एक सूचना पुढें आली आहे. सिंडिकेटच्या सभासदांनीं आपल्या येण्याबाबत थोडासा स्वार्थत्याग करावा आणि ह्या रीतीनें धंद्यावर आलेलें संकट दूर करण्याचा प्रयत्न व्हावा असेंहि सुचवण्यांत येत आहे. उत्तर हिंदुस्थानांतील साखर कारखान्यांची सांपत्तिक परिस्थिति किती गुंतागुंतीची आणि नाजुक झाली आहे ह्याची वरील माहितीवरून कल्पना येईल. तथापि, संयुक्तप्रांत व बिहार येथील कारखान्यांच्या हलाखीचा व ती नाहींशी करण्यासाठीं चाललेल्या स्थानिक उपायांचा प्रतिकूल परिणाम दक्षिणेकडील व इतर ठिकाणच्या कारखान्यांवर होणार नाहीं ह्या विषयींची काळजी हिंदुस्थान सरकारनें घेतली पाहिजे. ह्या बाजूच्या कारखानदारांनीं वेळींच जागरुकत्व दाखवून स्वतःच्या हितसंबंधांचें योग्य संरक्षण होईल अशी व्यवस्था करणें अगत्याचें आहे.

---

### हिंदी लोकसंख्येची वाढ

हिंदुस्थानची १९४१ सालाची दशवार्षिक शिरगणति चालू आहे. १९३१ सालीं हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांची मिळून लोकसंख्या ३५ कोटि, २० लक्ष होती. चालू वर्षी एकट्या हिंदुस्थानाचीच लोकसंख्या ४० कोटींवर जाईल, असा अंदाज आहे. १८७२ सालीं हिंदुस्थानची पहिली शिरगणति झाली. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशाच्या मोठ्या लोकसंख्येची शिरगणति करणें सोपें काम नाहीं. लोकांचें अज्ञान, गणति करणारांमध्यें कार्यतत्परतेचा व जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव, देशांतील लोकांमधील वैचित्र्य, इत्यादि गोष्टी अचुक गणतीस पोषक नाहींत. तथापि वाढत्या अनुभवानुसार हिंदी शिरगणति अधिकाधिक बरोबर होऊं लागली आहे. गोळा केलेल्या आकड्यांपासून लोकसंख्येच्या प्रवृत्तीचा निष्कर्ष काढण्यास तर कांहींच प्रत्यवाय नाहीं. हिंदुस्थानच्या क्षेत्रांत १९ व्या शतकांत एकसारखी वाढ होत होती, ह्यामुळें १९०१ पर्यंतचे आकडे त्या प्रमाणांत वाढलेले आहेत. शिरगणतीची पद्धतहि तोंपर्यंत नीट बसलेली नव्हती. खालील तक्त्यांत लोकसंख्येच्या वाढीचे आकडे दिले आहेत:—

| वर्ष | एकूण लोकसंख्या | | लोकसंख्येंत वाढ | | वाढीचें |
|---|---|---|---|---|---|
| | कोटि | लक्ष | कोटि | लक्ष | प्रमाण% |
| १८७२ | २० | ६२ | — | — | — |
| १८८१ | २५ | ३९ | ४ | ८० | ·२४ |
| १८९१ | २८ | ७३ | ३ | ३५ | १३·४ |
| १९०१ | २९ | ४४ | ० | ७० | २·४ |
| १९११ | ३१ | ५२ | २ | ५ | ७·० |
| १९२१ | ३१ | ८९ | | ३८ | १·२ |
| १९३१ | ३५ | २८ | ३ | ४० | १०·६ |

गेल्या तीस वर्षांत ( १९०१ ते १९३१ ) हिंदी लोकसंख्येंत २०% वाढ झाली. हिंदी संस्थानी प्रजेंत २१% वाढ झाली, तर ब्रिटिश हिंदी प्रजा १७% नीं वाढली. एकूण हिंदी लोकसंख्येपैकीं ६७% लोक शेतीच्या व्यवसायांत आहेत; सर्व पुढारलेल्या देशांतील लोक मुख्यतः उद्योगधंद्यांत गुंतलेले आहेत. ग्रेट ब्रिटनमधील २०% लोक खेड्यांत रहातात; हिंदुस्थानांतील ८९% लोक खेड्यांतीलच आहेत.


दि
बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना




मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

**The Co-operators' Book Depot.**
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

## बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची वार्षिक सभा

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची पांचवी वार्षिक सभा रविवार ता. २३ फेब्रुवारी रोजीं सायंकाळीं ५ वाजतां बँकेच्या नोंदलेल्या कचेरींत भरली होती. सभेस सुमारें ६० भागीदार उपस्थित होते. बँकेचे मॅनेजर, श्री. म. वि. गोखले ह्यांनीं सभेची नोटीस वाचून दाखविल्यावर बँकेचे अध्यक्ष, प्रो. वा. गो. काळे, ह्यांनीं बँकेचा ३१ डिसेंबर, १९४० अखेरचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट हीं भागीदारांकडे अगोदरच रवाना केलेलीं असल्यामुळें सभेंत त्यांचें वाचन करण्याची आवश्यकता नाहीं, असें सुचविलें व त्यास सभेनें अनुमति दिली. त्यानंतर त्यांनीं खालीलप्रमाणें भाषण केलें.

### प्रो. काळे ह्यांचें भाषण

"बँकेच्या पंचवार्षिक प्रगतीच्या आकड्यांवरून, बँकेचें भाग भांडवल, तिचेकडील ठेवी, बँकेनें दिलेलीं कर्जें, कर्जरोख्यांत गुंतविलेली रकम, रोख ठेवलेली रकम, ठेवींच्या खात्यांची संख्या, कर्जखात्यांची संख्या, इत्यादीबाबतची तुलनात्मक सर्व माहिती आपणांस मिळाली. रिझर्व्ह बँकेनें घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणेंच बँकेचा सर्व व्यवहार चालू आहे. सध्यासारख्या अनिश्चित परिस्थितींत हाताशी येण्याजोग्या तरत्या रकमा ठेवणें इष्ट आहे व त्यामुळें व्याजाचें थोडेंफार नुकसान झालें तरी प्रत्यवाय नाहीं. बँकेनें सेव्हिंग्ज ठेवींवरील व्याजाचा दर अर्ध्या टक्क्यानें उतरविला तरीसुद्धा ठेवींमध्यें अखंड वाढ होत चालली आहे, हें आकड्यांवरून स्पष्ट दिसत आहे. वाढत्या खेळत्या भांडवलाचे मानानें नफ्याचें प्रमाण वाढलेलें दिसत नाहीं, ह्याचें कारण हाताशी राखलेली मोठी रकम हें होय. बँकेच्या नोकरवर्गावर पडणाऱ्या जबाबदारीचे व कामाचे मानानें त्यास वेतन मिळणें आवश्यक आहे ह्याची जाणीव बोर्डास आहे. नोकर वर्गासाठीं केलेली प्रॉव्हिडंट फंडाची योजना व त्याच्या पगारांत केलेली वाढ ह्यांचे योगानें बँकेचा खर्च थोडा वाढलेहि. सरकारी कर्जरोख्यांतील घसारा भरून काढण्यासाठी बँकेनें बाजूस काढलेले फंड पुरेसे आहेत व घसाऱ्याचें प्रमाण मागील वर्षीच्या मानानें आतां पुष्कळच कमी आहे, ही परिस्थिति अत्यंत समाधानकारक आहे. कायद्याप्रमाणें काढावयाचा रिझर्व्ह फंड हा सालोसाल वाढतच आहे. बँकेच्या संचालकांना आपली बँक ही एक आदर्श संस्था करावयाची आहे व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न चालू आहेत. भागीदार, ठेवीदार व सामान्य जनता ह्यांच्या सहकार्यामुळेंच बँकेस आजचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत."

वरीलप्रमाणें भाषण करून, ताळेबंद, नफातोटा पत्रक व डायरेक्टर बोर्डाचा रिपोर्ट ह्यांस सभेनें अनुमति द्यावी असें त्यांनीं सुचविलें व त्यास श्री. धोंडूमामा साठे ह्यांनीं अनुमोदन दिलें.

ह्या सूचनेवर श्री. आ. रा. भट ह्यांनीं व इतर कांहीं भागीदारांनीं भाषण करून संचालकांचें बँकेच्या सावधगिरीयुक्त प्रगतिपर धोरणाबद्दल अभिनंदन केलें. ही सूचना मंजूर झाली. डायरेक्टर बोर्डानें सुचविलेलें ४% करमाफ डिव्हिडंड सभेनें मंजूर केलें व निवृत्त होणाऱ्या तिघांहि डायरेक्टरांची (प्रो. काळे, श्री. धोंडूमामा साठे व श्री. न. ग. पवार) फेरनिवड केली. श्री. द. ग. जोशी, श्री. गो. द. आपटे व मेसर्स कुलकर्णी आणि खानोलकर ह्या तिघांची ऑडिटर्सचे जागीं निवड झाली. वरील सर्व ठराव सर्वानुमतें मंजूर झाले. आभार प्रदर्शनानंतर सभेचें काम संपलें.

### बँकेची पंचवार्षिक प्रगति

| | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० |
|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| खेळतें भांडवल ... ... | ८,२६,४७८ | १३,३९,८७४ | १८,५५,६२७ | २३,१३,३१० | ३०,३१,७७० |
| वसूल भांडवल ... ... | १,०४,४९५ | १,१२,४४० | १,२५,३८० | १,५१,७२५ | १,८१.२७५ |
| चालू ठेवी ... ... | १,६४,५७५ | ३,२४,५२० | ५,५२,६८९ | ६,२७,०८९ | ७,१६,८०८ |
| सेव्हिंग्ज ठेवी ... .. | ३,२२,४३३ | ५,७२,२५१ | ६,९५,१९१ | ९,४८,९८१ | १३,५६,५११ |
| मुदतीच्या ठेवी ... ... | २,३३,९१५ | ३,१६,६१५ | ४,५७,५१५ | ५,०७,२७५ | ६,७९,०५५ |
| दिलेलीं कर्जें ... ... | १,९७,२५८ | १,९९,५५१ | ३,२९,८०७ | ३,७०,४८१ | ४,३५,२६५ |
| कॅश क्रेडिट्स ... ... | ६३,५९९ | ३,००,५२९ | ३,५४,५८५ | ७,०५,६१३ | ८,२२,३६६ |
| कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम ... | ४,८०,४६२ | ६,९८,३६५ | ८,८९,३१६ | ८,८१,५०६ | ११,४६,७४० |
| निवळ नफा ... ... | ६३५ | १२,७५२ | १७,५१५ | १९,२०० | २०,३१२ |

### खात्यांची वर्गवारी

| | १९३६ | १९३७ | १९३८ | १९३९ | १९४० |
|---|---|---|---|---|---|
| चालू खातीं ... ... | २४६ | ३२० | ३८२ | ५११ | ५९८ |
| सेव्हिंग्ज खातीं ... ... | ६०१ | १२३३ | १५६५ | १९६० | २६०४ |
| कर्ज खातीं ... ... | ७५ | १३० | १८२ | २०६ | २२१ |
| कॅश क्रेडिट् खातीं ... ... | ३१ | ६८ | ११९ | १५७ | १८७ |

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले.—वा. चिं. भानु )

**गोसाबाची वसाहत:**—सहकारी चळवळीच्या माहितीसाठी असो किंवा इतर कोणत्याही हेतूनें असो, बंगाल प्रांताची सफर करणारांनीं,कलकत्त्याजवळच असलेल्या सुंदरबनानजीक गोसाबाची वसाहत पाहिल्याशिवाय राहूं नये. मनांत तीव्र तळमळ, उदात्त हेतू व सोज्वळ पद्धति असल्यास, एकादी व्यक्ती समाजांतील महत्त्वाचे प्रश्न सहकारी मार्गानें कसे सोडवूं शकते याचा दाखला हवा असेल तर ही गोसाबाची वसाहत म्हणून दाखविण्यास हरकत नाहीं, अशी ग्वाही आग्रा प्रांताचे असिस्टंट रजिस्ट्रार श्री. चतुर्वेदी यांनीं इंडियन को-ऑपरेटिव्ह रिव्ह्यूमध्यें एका मनोरंजक प्रवासवृत्तांत दिली आहे.

* * *

मरहूम सर डॅनियल हॅमिल्टन यांनीं सरकारकडून अदमासें २२,००० एकरांचें रान वसाहतीसाठी घेतलें व त्यापैकीं १६,४०० एकर शेतीखालीं आणलें. 'सलत्-शिला', रंगुबालिया व गोसाबा हीं या टुमदार वसाहतींचीं केंद्रें असून गोसाबा हें सर्वांत मुख्य आहे. ही वसाहत करीत असतां, तीव्र स्वरुपाचा मलेरिया, अरण्यांतले वाघ व भयंकर विषारी सर्प यांचा प्रथम बंदोबस्त करण्यास अरण्य तोडून साफ करण्यापासून कामें करावीं लागलीं आहेत. सांप्रत या वसाहतीमध्यें २,००० कुटुंबें राहात आहेत. त्यांत सर्व धर्मांचा व जातींचा समावेश झालेला आहे. त्यामुळें ही वसाहत जातिविशिष्ट म्हणून समजली जात नाहीं.

* * *

या वसाहतीमध्यें पहिली को. कें. सोसायटी १९१६ सालीं स्थापन झाली. तिचे प्राथमिक भांडवल वसाहतीचे जमीनदार सर डॅनियल यांनींच पुरविलें होतें. हल्लीं तेथें अशा २१ सोसायट्या असून त्यांत ७७४ सभासद आहेत. या पतपेढ्यांना आरंभींच्या काळीं सर डॅनियल हेंच भांडवलाचा पुरवठा करीत असत. इ. स. १९२४ सालीं या वसाहतीमध्यें एक सेंट्रल बँक स्थापन करण्यांत आली. सहकारी तत्वावरच्या या संस्थांनीं खासगी सावकारांना वसाहतींत बिलकुल वाव मिळूं दिलेला नाहीं.

* * *

येथील सहकारी पेढ्या सभासदांना शेतीच्या कामासाठीं लागणारें कर्ज देतात. शेतांतून पिकणारा सर्व माल 'ज्यामिनी राईस मिल' खरेदी करते. या गिरणीचे सर्व भाग वसाहतींतल्याच सर्व शेतकऱ्यांमध्यें खपविलेले आलेले आहेत. गिरणी इतरत्र असणाऱ्या बाजारभावानेंच माल खरेदी करिते व ज्यांच्या मालाची विक्री झाली असेल त्यांना सेंट्रल बँकेमार्फत मालाची किंमत पोहोंचविते.

शेतकऱ्यांना माळविक्रीचा पैसा प्रत्यक्ष देताना बँक, त्या शेतकऱ्यांचा सोसायटीचा सव्याज हप्ता व जमिनीचा खंड कापून घेऊन उरणारी बाकी रोख देते. या अशा चक्राकार पद्धतीमुळें शेतकऱ्यांना मालाची किंमत भरपूर मिळते, सोसायटीचा हप्ता कधींही थकत नाहीं, जमिनदार सर डॅनियल यांचा खंड बिनभोभाट वसूल होतो, आणि बँकेचें सोसायटीकडील कर्जही वेळच्या वेळीं वसूल होतें. म्हणून शेतकऱ्यांस पुन: ऐन गरजेच्या वेळीं शेतकामासाठीं भरपूर भांडवल सोसायट्याहि हुकमी देऊं शकतात.

* * *

याप्रमाणें शेतीच्या मालाची विक्री व शेतकऱ्यांना भांडवलाचा पुरवठा यांची सांगड, सेंट्रल को. बँकेच्या मार्फतीनें राईस मिलबरोबर करण्यांत आल्याकारणानें सोसायट्यांकडे किंवा सभासदांकडे कर्जें थकत नाहींत. खरेदी केलेला माल राईस मिल कलकत्ता किंवा असल्याच मोठ्या बाजारांत घाऊक पद्धतीनें विकून याच बँकेमार्फत आपला पैसा मोकळा करिते.

* * *

अशाच तऱ्हेची कांहीं योजना आपल्या इकडच्या भागांत ज्वारी, बाजरी, करडी व गहूं या धान्यांबाबत करण्याचें सहकारी बँकांनीं, सरकार आणि सहकारी खातें यांच्या सक्रिय मदतीनें ठरविल्यास थकबाकीच्या बर्फाचे डोंगर वितळूं लागतील व 'सूट' आणि 'सवलती' या अनिष्ट अन् घरबुडव्या पद्धतीस चटावलेले कर्जदार, ऋणमुक्त होण्याच्या खऱ्या व टिकावू मार्गाला लागतील असें माझें प्रामाणिक मत आहे.

या वसाहतीमध्यें वरील सोसायट्याशिवाय, सहकारी तत्त्वावर चालविण्यांत आलेली एक वखारही आहे. वसाहतींतील शेतकऱ्यांना ही वखार, संसारांत नेहमीच्या लागणाऱ्या सर्व वस्तू व माल माफक भावानें पण रोखीनें देते. ज्या मचव्यांतून तांदूळ किंवा भात कलकत्त्यास जातें त्याच मचव्यांतून वखारीला लागणारा माल कलकत्त्याहून वसाहतींत आणला जातो. यामुळें वाहतुकीचा खर्च कमी पडून कलकत्त्याच्य भावानेंच वसाहतींतील शेतकऱ्यांना हा माल मिळूं शकतो.

शिक्षणप्रसाराच्या दृष्टीनेंही वसाहतीनें केलेली प्रगति स्पृहणीय आहे. १६ प्राथमिक शिक्षणाच्या शाळा, २ दुय्यम शिक्षणाच्या शाळा, एक मुलींची शाळा व एक मिडल क्लास इंग्लिश स्कूल अशा संस्था चालूं आहेत. शिवाय प्रौढ शिक्षणाचे दृष्टीनें २-३ रात्रीच्या शाळाही चालविण्यांत येत आहेत. या शाळांतून ग्रॅमोफोन, मॅजिक लँटर्न इत्यादि आधुनिक उपकरणें व वाचनालयेंही आहेत. शाळांना जोडून शेतीचें व्यावहारिक शिक्षण देण्याचे वर्ग चालविण्यांत येतात. त्यांतून होणारे प्रयोग व मिळणारे धडे वसाहतीच्या इतर शेतकऱ्यांनाही मार्गदर्शक होतात. हातमागावर कामें करण्याचें शिक्षण देणारे वर्गही कांहीं शाळांना जोडलेले आहेत. शिवाय एक 'सेंट्रल हँडलूम फॅक्टरी' (हातमागांचा विणकर कारखाना) वसाहतींत चालला असून त्यावर देखरेख करण्याची कामगिरी सेंट्रल बँकेवर सोपविलेली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भांडवलाचा पुरवठा अर्थातच बँकेनें केलेला असणार हें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं.

### वाळवंटांतील मोटारी

लिबियाच्या वाळवंटांत ब्रिटिशांपुढें इटालियन फौजेस पळ काढावा लागला, ह्याचें श्रेय कार्यक्षम यांत्रिक मोटारींचे ताफ्यांस पुष्कळसें आहे. ह्या मोटारींस मोठ्या आकाराच्या व कमी हवा भरलेल्या टायर्स लागतात. कढत वाळूंवरील चालीमुळें टायरमध्यें उष्णता उत्पन्न होते व त्यांतील हवेचा दाब वाढतो. टायर टणक होत चालली, म्हणजे तिचा कमी कमी भाग जमिनीवर टेकूं लागतो व टायर वाळूंत रुतते. वाळवंटांत पाण्याचें दुर्भिक्ष्य असल्यामुळें, इंजनांभोवतालचें पाणी उकळूं लागल्यास त्याच्या वाफेपासून पुन: पाणी करून तें रेडिएटरमध्यें सोडण्याची व्यवस्था मोटारींत करावी लागते. वाळूच्या कणांनीं कारब्युरेटर भरून जातात, तें टाळण्यासाठी फिल्टरमधून हवा घ्यावी लागते. इंजनें अत्यंत भक्कम व साधीं असणें तर अत्यावश्यक आहे. मऊ वाळूंतून बाहेर पडण्यास लागणारीं सर्व साधनें मोटारींत बाळगावीं लागतात.

## रेल्वे बजेटावरील सर अँन्ड्र्यू क्लो ह्यांचें भाषण

### कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश

बॉंबे बरोडा अँड सेंट्रल इंडिया रेल्वेच्या खरेदीसाठी २ कोटि, ६७ लक्ष रुपयांची व आसाम-बेंगाल रेल्वेच्या खरेदीसाठी २ कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

***

उतारूंच्या व मालवहातुकीच्या दरांत फेरबदल होण्याचा संभव नाहीं; परंतु कोळशावरील सरचार्ज एप्रिल ते ऑक्टोबर अखेर ५% कमी करण्याचा सरकारचा विचार आहे.

***

१९४०-४१ च्या हिशेबांत मोठा वाढावा आढळला असला, तरी त्याचा विनियोग रिझर्व्ह निर्माणकडे मुख्यत: करण्यांत येणार नाहीं. १४३ कोटींपैकीं १० कोटि मध्यवर्ती सरकारास मिळतील.

***

आगगाडीचीं इंजनें करण्यासाठीं काढलेलें वर्कशॉप आतां युद्धविषयक गोष्टींच्या उत्पादनासाठीं उपयोगांत आणलें जात आहे.

***

परदेशीं पाठविण्यासाठी रुळांची आवश्यकता आहे, त्याकरितां १८ रेल्वे रस्ते उखडण्यांत यावयाचे आहेत, त्यांपैकीं ९ रेल्वे रस्ते आतांपर्यंत बंद करण्यांत आले आहेत.

***

सरकारी रेल्वेजपैकीं ज्या रेल्वे उखडून टाकल्या आहेत, त्यांत १ कोटि, ९० लक्ष रुपयांचें भांडवल गुंतलेलें होतें.

***

येत्या वर्षी नवीन रेल्वे फाटयांचें कोणतेंच काम हातीं घेतलें जाणार नाहीं.

***

हिंदी रेल्वेजमध्यें सुमारें ७ अब्ज, ६१ कोटि रुपये भांडवल गुंतलेलें आहे.

***

बी. बी. अँड सी. आय. रेल्वेच्या भाग भांडवलापैकीं ९६% भांडवल सरकारचेंच आहे. आतां तिच्या खरेदीसाठीं फक्त २ कोटि, ६७ लक्ष रुपये यावयाचे आहेत.

***

जानेवारी, १९४० मध्यें एक ट्रॅन्सपोर्ट अडव्हायसरी ऑफिसर नेमण्यांत आला. त्याचे साहाय्यामुळें माल वहातुकीस अधिक वॅगन्स पुरविणें शक्य झालें. ईस्ट इंडियन व बेंगाल नागपूर रेल्वेनें जानेवारी ते एप्रिल ह्या पांच महिन्यांत त्या वर्षापूर्वीच्या तत्सम मुदतीमधील पुरवठ्यापेक्षां ४८ हजार वॅगन्स अधिक पुरवल्या.

***

उतारूंची संख्या वाढण्याच्या मानानें त्यांच्या तिकिटांचें उत्पन्न पुष्कळच अधिक झालें. रिकामे डबे वाढत्या उतारूंच्या संख्येनें भरले; त्यासाठी जादा खर्च आला नाहीं.

***

जानेवारी, १९४१ मध्यें उतारूंची संख्या एकदम वाढली व त्यामुळें त्यांच्या तिकिटांचें उत्पन्न अनपेक्षितपणें वाढलें.

***

## आकडेशास्त्र म्हणजे काय ?

( डॉ. सुखात्मे ह्यांच्या, पुणें येथील रिसर्च वर्कर्स असोसिएशनमधील एका भाषणाचा सारांश )

" कोणतीहि गोष्ट घडण्यास अनेक कारणें असूं शकतात. जमिनीचा सकसपणा, हवामान, कीड, बियांचा प्रकार, लागवडीची पद्धत, इत्यादि अनेक गोष्टींवर पिकांचें उत्पादन अवलंबून असतें. प्रयोग करणारा शास्त्रज्ञ बाकी सर्व कारणें नियंत्रित करून एकाच कारणांत फेरबदल करून त्याचे परिणामांचा अभ्यास करीत असतो. उदाहरणार्थ, उष्णतामान कायम ठेवून, एकाद्या पदार्थाचें घनफळ दाबाप्रमाणें कसें बदलतें, हें बॉइल्स लॉ सांगतो. प्रत्यक्ष व्यवहारांत, इतके नियंत्रित प्रयोग करणें कठीण असतें. दोन शेतांत घातलेल्या खतांचा त्यांत येणाऱ्या पिकांवरील परिणाम बघावयाचा आहे, असें आपण समजूं. हीं दोन्हीं शेतें शक्य तितकीं एकसारखीं केलीं, तरी तीं पूर्णपणें सारखीं होणें अशक्य आहे. प्रयोगशाळेतहि, मनुष्याच्या दृष्टीनें मोजावयाच्या गोष्टींत थोडीफार चूक आढळतेच. परंतु ही चूक अत्यल्प असल्या कारणानें, प्रयोगाचा निष्कर्ष काढतेवेळीं ती लक्षांत घेतली नाहीं तरी बिघडत नाहीं. परंतु शेतीच्या संशोधनाचे बाबतींत किंवा इतर प्रयोगांत मात्र ही चूक लक्षांत न घेणें घातुक ठरेल.

### आकडेशास्त्राचीं प्रमुख कामें

" ज्या प्रश्नांचे संबंधांत दिलेल्या अगर गृहीत धरलेल्या गोष्टी बरोबर अथवा चूक असणें अनेक कारणांवर अवलंबून असतें, अशा प्रश्नांचे विचाराचे वेळीं आकडेशास्त्राची विशेष मदत होते. ( १ ) ज्यापासून बरोबर सिद्धांत काढतां येईल, असे प्रयोग आखणें व ( २ ) प्रयोगांतून निष्पन्न होणाऱ्या गोष्टी योग्य रीतीनें मांडून त्यांपासून बरोबर अनुमान काढणें, हीं आकडेशास्त्राचीं दोन प्रमुख कामें आहेत. ज्यांचें नियंत्रण करतां येत नाहीं अशा कारणांच्या परिणामांस योग्य तें महत्त्व देणें जरूर असतें, हें उघड आहे. निष्पन्न होणाऱ्या गोष्टींपासून ज्या पद्धतीनें सिद्धांत काढतात, त्यास आकडेशास्त्राची पद्धत म्हणतां येईल; ज्या तत्त्वांवर ही पद्धत आधारलेली असते, त्यास आकडेशास्त्राचें मूल तत्त्व म्हणतां येईल व ज्यांचे आधारानें ही पद्धत काढली, तें गणितशास्त्र होय. "

डॉ. सुखात्मे ह्यांनीं नंतर आकडेशास्त्राच्या दोन प्रमुख कार्यांचे स्पष्टीकरणार्थ उदाहरणें दिलीं व आपलें ध्येय साध्य करण्याकरितां आकडेशास्त्रज्ञ कशी योजना करतात, त्याचेंहि वर्णन केलें. आकडेशास्त्राचा त्यांनीं इतिहास निवेदन केला. पुढें ते म्हणाले:—"प्रत्येक शास्त्रांतील कांहीं जुने सिद्धांत आजच्या नव्या विवेचक परीक्षेस उतरत नाहींत व त्यांची जागा नवे सिद्धांत घेत आहेत. जुनें शिकलेलें विसरण्याची पाळी येत आहे. आकडेशास्त्र तरी त्यास अपवाद कसें ठरणार? प्रत्येक शास्त्रज्ञास आकडेशास्त्राच्या पद्धतीनेंच अनुमानें काढावीं लागतात. प्रत्येक तरुण शास्त्रज्ञानें आकडेशास्त्राची चांगली माहिती करून घेतली पाहिजे."

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

---

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

---

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—१० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९५—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९६–१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४५—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४३—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५६१—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३४—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १८२५—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ६६०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४६–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ८ आ. ... | ४१—४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४८—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३७४—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै... | १८९०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४०—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–१४–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६२–१५–० |


**संजीवन हेअर टॉनिक**
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**“ अर्थ ” ग्रन्थमालेंतील पुस्तकें**
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.
* * *
१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

पुण्यांत आल्यावर
सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या
**OUR HOME**
या
कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत
**उतरण्यास या.**
मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी
याच एका ठिकाणीं
अनुभवास येतील.
**अवर होम्,**
६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.




फोन नं. ७७१ व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अतीस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
लक्ष्मी टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडेमी, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचें माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्यांचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.